**Dept. of Political Science**

***Event/Activity details***

***2019-2020***

| | |
|---|---|
| Event Tile | **'Training Programme for Capacity Building of Sarpanch & Deputy Sarpanch.'** |
| Organized By | Department of Political Science & IQAC |
| Date of Organization | **31th August 2019** |
| Funding Agency | S. T. U. S. Mandal, Sangola |
| Collaboration/MOU | **YASHADA, Pune** |
| Activity for Group | Sarpanch & Deputy Sarpanch |
| Beneficiary number | **42** |
| Coordinator | Prof. Mane J. V |
| Nature : | **Social** |
| Description | Date : **31th August 2019**<br><br>Time : 10:00 am to 5:00 pm<br><br>Venue : Step Hall, Sangola College,Sangola<br><br>**'Training Programme for Capacity Building of Sarpanch & Deputy Sarpanch'** was organized in the college on **Saturday, August 31, 2019** in collaboration with **Yashada, Pune** and Department of Political Science. **42** Sarpanchs, Deputy Sarpanch participated in the training program. **Hon'ble Baburaoji Gaikwad**, President of S. T. U. S. Mandal, presided. The inauguration was completed in the presence of the Vice-President of the S. T. U. S. Mandal **Hon'ble Tatyasaheb Kedar**, Secretary of the S. T. U. S. Mandal, **Hon'ble. M. S. Zirpe**, Principal **Dr. Madhusudan Bachute.** The training was organized in two sessions. In the |

| | |
|---|---|
| | first session, **Hon'ble B. M. Varale (Deputy Director, State Rural Development Institute, Yashada Pune)** guided. While in the second session **Hon'ble Anand Pusavale (Director, Water Literacy Centre, Yashada, Pune)** guided. At the Valedictory of the training, various Sarpanch & Deputy Sarpanch expressed their thoughts. On this occasion the Vice President of the S. T. U. S. Mandal **Hon'ble. Prof. P. C. Zapke, Principal Dr. Madhusudan Bachute** was present. |

Photographs





## सांगोला महाविद्यालयात सरपंच, उपसरपंच यांचेसाठी क्षमता वृध्दी प्रशिक्षण संपन्न

सांगोला /प्रतिनिधी–
सांगोला महाविद्यालयामध्ये तालुक्यातील सरपंच, उपसरपंच यांचेसाठी शनिवार दि.३१ ऑगस्ट २०१९ रोजी क्षमता वृध्दी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यशदा पुणे, महाविद्यालयाचा अंतर्गत गुणवत्ता हमी सेल व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात तालुक्यातील एकूण ४२ सरपंच, उपसरपंच यांनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणाचे उद्घाटन यशदा पुणे येथील राज्य ग्रामीण विकास संस्थेचे उपसंचालक, मा.बी.एम.वराळे यांचे हस्ते झाले. तर अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष बाबुराव गायकवाड हे होते. आपल्या स्वअनुभवातून, ग्रामपंचायतचे कामकाज आदर्शवत कसे करावे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावरून संस्थेचे उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार बोलताना म्हणाले की, ग्रामसभा म्हणजे गावची मिनी लोकसभा होय, यामध्ये सरपंचांनी आपल्या अधिकारांचा वापर करून गावचा सर्वांगीण विकास साधावा. यावेळी संस्था सचिव म.सि.झिरपेसर व इतर संस्था पदाधिकारी उपस्थित होते.

मा.बी.एम.वराळे यांनी सरपरंच, उपसरपंच यांची कार्ये, अधिकार व सामाजिक बांधिलकी विषयी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी सरकारच्या विविध ग्रामविकास योजनांचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमाच्या दुस–या सत्रामध्ये गटविकास अधिकारी मा. संतोष राऊत यांनी तालुक्यामध्ये पंचायत समितीने केलेल्या कार्याचा परिचय करून दिला. यशदाच्या जलसाक्षरता केंद्राचे संचालक, मा.आनंद पुसावळे यांनी दुष्काळी भागामधील जलसाक्षरतेचे महत्व प्रतिपादीत केले. त्यांनी जलपुनर्भरण, पाणी साठविणे या विषयी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी विविध सरपंच, उपसरपंच यांनी आपले अनुभव प्रकट केले. या प्रशिक्षणाचा भविष्यात उपयोग होणार आहे असे मत व्यक्त केले. समारोप सत्राच्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.पी.सी. झपकेसर यांनी आपल्या राजकीय व सामजिक जीवनातील अनुभवाच्या आधारे या प्रशिक्षणाचा सरपंचाना कसा उपयोग होणार आहे हे सांगितले. या प्रशिक्षणाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुसूदन बचुटे, अंतर्गत गुणवत्ता हमी सेलचे प्रमुख डॉ.टी.आर.माने यांच्या मार्गदर्शनामध्ये पार पडले. प्रा.जे.व्ही.माने (राज्यशास्त्र विभाग) यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. या प्रशिक्षणास सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.